## प्रेसनोट दिनांक - २५/०८/२०१९
## डेक्कन पोलीस स्टेशन, पुणे शहर

**जेष्ठ नागरिक मोटार सायकल वरुन जात असताना रस्त्यात चक्कर येवुन पडले त्यांना तात्काळ पोलीसांनी उपचार कामी हॉस्पिटल येथे नेले.**

---

दिनांक २४/०८/२०१९ रोजी श्री कौटकर पोलीस शिपाई ३६३६ व श्री शिंगाडे पोलीस शिपाई ९९५२ यांना बालगंधर्व बीट मार्शलवर दिवसपाळी ड्युटी असताना १५/०० वा दरम्यान एफ सी रोड भागात पेट्रोलिंग करत असताना गुडलक चौक येथे एक जेष्ठ नागरिक गाडीवरुन पडला असल्याने त्यांचेकडे विचारणा केली असता त्यांनी आपले नाव अलम कृष्णा वय ७१ वर्षे रा. तेजस हाईट्स पिंपरी चिंचवड पुणे असे सांगन मी कर्वे रोड येथे कामानिमीत्त आलो होतो. माझे काम संपल्यानंतर मोटार सायकल नंबर एम एच १४ जी जे ४५०१ वरुन मी घरी जात असताना मला चक्कर आली आणि मी रस्त्यावर स्वतः घसरुन पडलो. बिट मार्शल वरील कर्मचारी यांनी तात्काळ प्रयाग हॉस्पिटलमध्ये दाखल केले. हॉस्पिटलला डॉक्टरांनी प्रथमोपचार केले त्यानंतर बालगंधर्व मार्शल वरील कर्मचारी यांनी जेष्ठ नागरिक यांना त्यांच्या घरी सुखरुप सोडले म्हणुन त्यांनी पोलीसांचे आभार मानले.